# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचा अंगिकृत व्यवसाय )

उद्योग सारथी, मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-४०० ०९३.

## परिपत्रक

क्रमांकः मऔविम/भूविभाग/ E03211 दिनांक :०६.१२.२०२२

विषय :- भूखंड/शेड/गाळा वाटपाबाबत सुधारीत धोरण

संदर्भ:- परिपत्रक क्रं मऔविम/भूविभाग/D१४५०२ दिनांक २६/०९/२०१६.

महामंडळाने विकसीत केलेल्या औद्योगिक क्षेत्रामधील आरेखीत भूखंडाचे वाटप MIDC Disposal of Land Regulations, १९७५ मधील तरतुदीप्रमाणे तसेच महामंडळाच्या सदस्य मंडळाच्या बैठकीत वेळोवेळी ठरावाद्वारे घेतलेल्या निर्णयानुसार / प्रशासकीय निर्णयानुसार प्रसिध्द करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे करण्यात येते. संदर्भिय परिपत्रकानुसार भूखंड / शेड / गाळा यांचे वाटप, हस्तांतरण व इतर प्राप्त प्रस्तावावर निर्णय घेणेकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या प्रादेशिक अधिकारी / उप मुख्य कार्यकारी अधिकारी / सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावरील भूखंड वाटप समित्यांना अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत. तथापि, सदर अधिकारांमध्ये बदल करणे आवश्यक असल्याने महामंडळाचे संदर्भांकित परिपत्रकातील मुद्दा क्रमांक ५ मध्ये **भूखंड वाटप समितीच्या** अधिकारामध्ये खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत.

**५.१) भूखंड/शेड/गाळा वाटप**

| अ. क्र. | कामकाज विषय | अधिकार प्रदान केलेली समिती / अधिकारी |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | **औद्योगिक भूखंडाचे वाटप करणे**<br>अ) ५००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भूखंडाचे वाटप करणे. MSME उद्योजकांना २५०० चौ.मी. पर्यंत भूखंड वाटप करणे. | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | आ) ५००१ चौ.मी. ते ७००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भूखंडाचे वाटप करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | इ) ७००१ चौ.मी. ते १०,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भूखंडाचे वाटप करणे. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | ई) १०,००० चौ.मी. क्षेत्रफळापेक्षा जास्त. | मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | उ) माहिती व तंत्रज्ञान / जैव तंत्रज्ञान उद्यानातील बिल्ट-अप गाळे इत्यादिंचे वाटप करणे | सह मुख्य कार्यकारी अधिकारी (प्रशासन/विशेष प्रकल्प) यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| २ | **व्यापारी भूखंड / व्यापारी गाळयांचे वाटप करणे** | **सर्व व्यापारी भूखंड / गाळे निविदा पध्दतीने.** |

| | | |
|---|---|---|
| ३ | **निवासी भूखंडाचे वाटप करणे** | **सर्व निवासी भूखंड (महामंडळाच्या कर्मचाऱ्यांच्या मागणी व्यतिरीक्त) निविदा पध्दतीने.** |
| ४ | **बिल्टअप शेड / गाळे वाटप करणे**<br>अ) १००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत बिल्टअप शेडचे वाटप करणे,<br>तसेच १००० चौ.मी. पर्यंत बिल्टअप एरियाचे गाळे वाटप करणे. | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | आ) १००१ चौ.मी. ते २००० चौ.मी. पर्यंत क्षेत्रफळाचे बिल्टअप शेडचे वाटप करणे<br>तसेच १००१ ते २००० चौ.मी. पर्यंत बिल्टअप एरियाचे गाळे वाटप करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | इ) २००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे बिल्टअप शेडचे वाटप करणे,<br>तसेच २००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाचे बिल्टअप एरियाचे गाळे वाटप करणे | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| ५ | **(अ) नियोजनानुसार वाटपास उपलब्ध असलेले आरेखीत भूखंड उद्योग विस्ताराकरिता वाटप करणे**<br>१) २००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भूखंडाचे वाटप करणे (अ, ब आणि पीएमआर विभागातील औद्योगिक क्षेत्रे वगळून) | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती |
| | २) २००१ चौ.मी. ते ५००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडाचे वाटप करणे<br>(अ, ब आणि पीएमआर विभागातील औद्योगिक क्षेत्रे वगळून) | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | ३) ५००१ चौ.मी. ते ७००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडाचे वाटप करणे<br>(अ, ब आणि पीएमआर विभागातील औद्योगिक क्षेत्रे वगळून) | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | ४) अ, ब आणि पीएमआर विभागातील औद्योगिक क्षेत्रातील सर्व क्षेत्रफळाचे भूखंड, क, ड आणि ड+ विभागामधील औद्योगिक क्षेत्रातील ७००० चौ.मी. पेक्षा जास्त क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करणे. | मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भूखंड वाटप समिती. |
| | **(आ) मोकळया/सुविधा/भूखंड पाडण्यायोग्य क्षेत्रामधुन औद्योगिक प्रयोजनात रुपांतर करुन रुपांतरीत जागेचे उद्योग विस्तारासाठी वाटप करणे.** | मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कार्यभारानुसार. |
| ६ | **सोयी-सुविधा तसेच दिनांक ०९.०२.२०१० च्या परिपत्रकानुसार सवलतीच्या दराने भूखंडाचे वाटप करणे.** | मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कार्यभारानुसार. |
| ७ | **अ) प्रकल्पग्रस्त / अपंग सदराखाली १०० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भूखंडाचे वाटप करणे तसेच प्रकल्पग्रस्तांना १५ टक्के परतावा जमिनीचे वाटप करणे.** | प्रादेशिक अधिकारी |

| | | |
|---|---|---|
| | **आ) प्रकल्पग्रस्तांच्या गटाने स्थापन केलेल्या JVC / Partnership Firm ला भूखंडाचे वाटप करणे.** | उप मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ८ | **प्राधान्य सदराखाली सर्व प्रकारच्या व क्षेत्रफळाच्या भूखंडाचे वाटप करणे. ( उदा. शासनमान्य विशाल प्रकल्प, परकिय गुंतवणूक आणणारे उद्योजक, संरक्षण विभागास यंत्रसामुग्री पुरविणारे उद्योजक, फॉर्च्युन ग्लोबल / इकॉनॉमिक टाईम्स कंपन्या, इत्यादि )** | मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कार्यभारानुसार. |
| ९ | **निविदाद्वारे भूखंडाचे वाटप करणे (औद्योगिक, निवासी, व्यापारी इत्यादि)** | मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने म.व्य.(भूमी) विभागामार्फत निविदा काढाव्यात. सदरहू निविदा संबंधित उप मु.का.अ. यांच्या समितीमार्फत उघडण्यात येवून त्यांचा अहवाल मु. ले. अ. यांच्यामार्फत मु.का.अ. यांची मान्यता प्राप्त झाल्यानंतर, मान्यतेनुसार भुखंडाचे वाटप प्रादेशिक स्तरावर करण्यात यावे. |
| १०. | **वृक्षारोपण/बागबगीचा/सुशोभिकरणासाठी जागा वाटप करणे**<br>अ) ५,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भूखंडाचे वाटप करणे. | प्रादेशिक अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भुखंड वाटप समिती. |
| | आ) ५,००१ चौ.मी. ते ७,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भुखंडाचे वाटप करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखालील भुखंड वाटप समिती. |
| | इ) ७,००१ चौ.मी. व त्यावरील क्षेत्रफळाच्या भुखंडाचे वाटप करणे. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कार्यभारानुसार. |

## ५.२)भूखंड/शेड/गाळा हस्तांतरण करण्यास प्राधिकृत करण्यात आलेले अधिकार-

| अ.क्र. | कामकाजविषय | अधिकार प्रदान केलेले अधिकारी |
|---|---|---|
| १. | **औद्योगिक भुखंड हस्तांतरण करणे**<br>अ). ५,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंत भुखंडाचे हस्तांतरण करणे. | प्रादेशिक अधिकारी. |
| | आ) ५,००१ चौ.मी. ते ७,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भुखंडाचे हस्तांतरण करणे. | उप मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | इ) ७,००१ चौ.मी. ते १०,००० चौ.मी. क्षेत्रफळापर्यंतच्या भुखंडाचे हस्तांतरण करणे. | सह मुख्य कार्यकारी अधिकारी यांना सोपविण्यात आलेल्या कार्यभारानुसार. |
| | ई) १०,००० चौ.मी. क्षेत्रफळापेक्षा जास्त | मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने सह मुख्य कार्यकारी अधिकारी. |
| | उ) सोई-सुविधा, सवलतीच्या दराने तसेच प्राधान्य सदराखाली वाटप केलेल्या सर्व प्रकारच्या व क्षेत्रफळाच्या भुखंडाचे हस्तांतरण करणे (उदा. शासनमान्य विशाल प्रकल्प, परकिय गुंतवणूक आणणारे उद्योजक, संरक्षण विभागास यंत्रसामुग्री पुरविणारे उद्योजक, फॉर्च्युन ग्लोबल/इकॉनॉमिक टाईम्स कंपन्या सोई-सुविधासाठी वाटप केलेले भुखंड, उद्योग विस्तारासाठी वाटप केलेले भुखंड, इत्यादि). | मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मान्यतेने सह मुख्य कार्यकारी अधिकारी. |